# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः10.03.2024** **वारःरविवार**

---

1. पंतप्रधानांच्या हस्ते आज देशभरातल्या 15 विमानतळांच्या नवीन इमारतींचं उद्घाटन आणि पायाभरणी
2. स्वदेशी बनावटीचं भारतातील हाय स्पीड राउटर विकसित.
3. जागतिक भू-राजकीय अस्थिरता असूनही देशातील पेट्रोलच्या किंमती आटोक्यात.
4. कॅच द रेन 2024 मोहिमेचा जलशक्ती मंत्री गजेंद्र सिंह यांच्या हस्ते दिल्लीत काल शुभारंभ
5. भारताची सात्विक साईराज -चिराग शेट्टी जोडी फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल आणि
6. शेवटच्या कसोटी क्रिकेट सामन्यात इंग्लंडला एक डाव 64 धावांनी पराभूत करत भारताचा मालिका विजय

**<u>पंतप्रधान मध्य प्रदेश दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मध्य प्रदेशातल्या ग्वाल्हेर आणि जबलपूर सह देशभरातल्या 15 विमानतळांच्या नवीन इमारतींचं उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात येमार आहे. विकसित भारत या संकल्पाअंतर्गत 9 हजार 811 कोटी रुपयांच्या हवाई प्रकल्पांचे उद्धाटन पंतप्रधान करतील. ग्वाल्हेरमध्ये बांधण्यात आलेलं राजमाता विजयराजे एअर टर्मिनल हे देशातलं सर्वात मोठं विमानतळ असून ते दोन लाख 20 हजार चौरस फूट क्षेत्रात विस्तारले आहे. अवघ्या सोळा महिन्यात याचं बांधकाम पूर्ण करण्यात आलं आहे. या इमारतीत इतिहास, संस्कृती, आधुनिकता आणि परंपरा यांची झलकही पाहायला मिळणार आहे.

**<u>पंतप्रधान छत्तीसगड</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते छत्तीसगड राज्य सरकारच्या महतारी वंदन योजनेचा शुभारंभ दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून होणार आहे. यावेळी योजनेच्या महिला लाभार्थींशीही पंतप्रधान संवाद साधणार आहेत. योजनेअंतर्गत 70 लाख लाभार्थी महिलांना दर महिना हजार रुपये ऑनलाईन स्वरुपात हस्तांतरीत केले जाणार आहेत. आज थेट हस्तांतरणाच्या माध्यमातून पहिल्या टप्प्यात 655 कोटी रुपयांहून अधिक रक्कम देण्यात येणार आहे. छत्तीसगडची राजधानी रायपूर मध्ये होणाऱ्या मुख्य कार्यक्रमात मुख्यमंत्री विष्णूदेव साई उपस्थित राहाणार आहेत.

**<u>राऊटर</u>**

केंद्रीय दळणवळण, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल बेंगळुरूमध्ये भारतातील सर्वात वेगवान आणि स्वदेशी विकसित मल्टीप्रोटोकॉल लेबल स्विचिंग राउटरचं उद्धाटन केलं. या राऊटरमुळे देशाच्या डिजिटल पायाभूत सुविधांना चालना मिळेल आणि हाय स्पीड डेटा प्रोसेसिंग आणि ट्रान्समिशनच्या मागणीला पाठिंबा मिळेल, असं सांगत अश्विनी वैष्णव म्हणाले की, भारतात 2 पूर्णांक 4 टेराबिट प्रति सेकंद गतीचा स्वदेशी राउटर विकसित करण्यात आला आहे ही अत्यंत अभिमानाची बाब असून हे अत्याधुनिक राउटर, स्वावलंबन आणि तांत्रिक नवकल्पनांच्या दिशेनं वाटचाल करणाऱ्या राष्ट्रासाठी एक महत्त्वाची संधी आहे, असंही ते म्हणाले. स्वदेशी आणि सुरक्षित राउटरचा विकास हा डिजिटल इंडिया उपक्रमातील एक महत्त्वाचा टप्पा असून भारत आता अधिक क्षमतेसह अनेक नावीन्यपूर्ण, हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरसह हाय-टेक उत्पादनांचा पाया रचत आहे. दूरसंचार विभाग आणि सी- डॉट यांच्या सहकार्यानं बेंगळुरूच्या निवेटी सिस्टम्सनं हे हाय स्पीड राउटर विकसित केलं आहे.

**<u>पेट्रोलियम</u>**

जागतिक कच्च्या तेलाच्या किंमतीच्या महागाईनं प्रभावित असलेल्या देशांमध्ये सर्वात कमी प्रभावित देशांपैकी भारत एक आहे, असं मत पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी सांगितलं की, 2020 ते 2022 दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारात 303 टक्क्यांच्या वाढीच्या तुलनेत देशांतर्गत स्वयंपाकाच्या गॅसच्या (एलपीजीच्या) किंमती केवळ 72 टक्क्यांनी वाढल्या आहेत. तर पेट्रोलच्या दरात जागतिक महागाई असूनही भारतात पेट्रोलचे दर 4 पूर्णांक 5 टक्क्यांनी कमी झाले आहेत. भारतात 85 टक्के पेट्रोल आयात होत असून सध्या चालू असलेल्या जागतिक भू-राजकीय अस्थिरतेमुळे पुरवठा साखळीवर परिणाम होत असल्यानं सध्या पेट्रोल आयात एक मोठं आव्हान आहे. मात्र आपला देश स्वदेशी नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात प्रगती करत आहे आणि सातत्यानं अनुदान देत आहे, त्यामुळं किंमतीतील वाढ आटोक्यात ठेवली जाईल, असंही हरदीप सिंग पुरी यांनी सांगितलं.

**<u>जल-महिला</u>**

जल व्यवस्थापन आणि जल संवर्धनामध्ये महिलांच्या देशभरातील योगदानाचं कौतुक जलशक्ती मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्लीत देशव्यापी 'जल शक्ती अभियान: कॅच द रेन-2024' या मोहिमेचं उद्घाटन करताना बोलत होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, देशातल्या सुमारे एक कोटी महिलांनी सकारात्मक बदल घडवून आणण्याची जबाबदारी उचलली आहे, म्हणूनच पंतप्रधानांनी जलशक्ती अभियान राष्ट्राच्या महिला शक्तीला समर्पित करण्याचा निर्णय घेतला आहे. ते असेही म्हणाले की, एक दशकापूर्वी आपला देश पाच नाजूक अर्थव्यवस्थांपैकी एक होता, आणि आता आपला देश पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनला आहे आणि तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याच्या मार्गावर वाटचाल करत आहे. 'जल शक्ती अभियान: 2019 ते 2023' आणि 'जल जीवन मिशनचे 101 वॉटर चॅम्पियन्स' या दोन पुस्तकांचं लोकार्पणही शेखावत यांनी केलं. या मोहिमेची पाचवी आवृत्ती 'नारी शक्ती से जल शक्ती' या संकल्पनेवर आधारित होती. 'जल शक्ती अभियान: कॅच द रेन-2024' ही मोहीम या वर्षी 30 नोव्हेंबरपर्यंत देशातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार असून, यामध्ये शहरी आणि ग्रामीण भागांचा समावेश केला जाईल. या मोहिमेमध्ये जलसंधारण आणि पावसाचं पाणी साठवणं, सर्व जलस्रोतांची गणना, जिओ-टॅगिंग यादी तयार करणे आणि जलसंधारणासाठी शास्त्रोक्त आराखडे तयार करणं, सर्व जिल्ह्यांमध्ये जलशक्ती केंद्र उभारणं,तसंच वनीकरण आणि जनजागृती यांचा समावेश असेल, यांचा समावेश असेल

**<u>न्यूझीलंड उपपंतप्रधान</u>**

न्यूझीलंडचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री विन्स्टन पीटर्स उद्या, चार दिवसांच्या अधिकृत भारत भेटीवर येत आहेत. गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये नव्या सरकारची स्थापना झाली, त्यानंतर पीटर्स यांची ही पहिलीच भारत भेट असून, ते अहमदाबाद आणि दिल्ली या शहरांना भेट देणार आहेत. यापुर्वी फेब्रुवारी 2020 मध्ये त्यांनी उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री असताना भारताला भेट दिली होती.

**<u>स्लीपरट्रेन</u>**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते काल वंदे भारत स्लीपर ट्रान्झिट ट्रेनच्या कार बॉडी स्ट्रक्चर चे उद्घाटन करण्यात आलं. बंगळुरूतल्या सार्वजनिक उद्योग क्षेत्रातल्या भारत अर्थ मूवर्स लिमिटेड म्हणजे बीईएमएल या आस्थापनेनं याची निर्मिती केली आहे. काल झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते वंदे भारत रेल्वेमध्ये वापरल्या जाणाऱ्या संरचनेचे उद्घाटन केले. येत्या काही महिन्यांत पहिली वंदे भारत स्लीपर रेल्वे तयार होण्याची अपेक्षा आहे. बीईएमएल चे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक शंतनू रॉय यांनी दिलेल्या माहितीनुसार, वंदे भारत ची स्लीपर रेल्वे ही राजधानी एक्सप्रेस गाडीपेक्षा उत्कृष्ट असेल तसेच जागतिक दर्जाच्या सुविधांसह सुरक्षित, आरामदायी आणि वेगवान रेल्वे प्रवासाचा अनुभव प्रवाशांना घेता येणार आहे. वंदे भारत स्लीपर रेल्वे मध्ये वातानुकुलित डबे असतील ज्यात 11 थ्री टायर, चार टू टायर डबे तसेच एक पहिला वर्गाचा डबा ठेवण्याची योजना आहे. प्रवाशांची सोय लक्षात घेऊन, स्लीपर वंदे मातरम् रेल्वेत सुरळीत प्रवास, उत्तम प्रकाश व्यवस्था आणि वरच्या बर्थवर जाण्यासाठी शिडी आणि स्वयंचलित दरवाजे देखील असतील.

**<u>एनटी निवडणूक</u>**

लोकसभा निवडणुका तोंडावर आलेल्या असताना निवडणूक आयुक्त अरूण गोयल यांनी आयुक्त पदाचा राजीनामा दिला आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गोयल यांचा राजीनामा स्विकारला आहे. गोयल यांच्या राजीनाम्यामुळे निवडणूक आयोगामध्ये आयुक्तांची दोन पदे रिक्त झाली आहेत. गोयल यांनी नोव्हेंबर 2022 मध्ये निवडणूक आयुक्त म्हणून पदभार स्विकारला होता.

**<u>फ्रेंच ओपन भारत</u>**

फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज आणि चिराग शेटी यांच्या जोडीने पुरूष दुहेरीच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. काल रात्री पॅरिसमध्ये झालेल्या सामन्यात भारतीय जोडीनं कोरियाच्या कांग मिन ह्युक- सेओ सेउंग जाये जोडीचा पराभव केला. सध्या जागतिक क्रमवारीत अग्रमानांकित भारतीय जोडीनं विद्यमान विश्वविजेत्या जोडीचा 21-13, 21-16 असा सरळ सेटमध्ये पराभूत केलं. तर पुरूष एकेरीच्या उपांत्य फेरीत जागतिक क्रमवारीत 19 व्या क्रमांकावर असलेल्या लक्ष्य सेनला 8 व्या मानांकित थायलंडच्या कुनलावुत कडून, 21-19, 13-21, 11-21 असा पराभव पत्करावा लागला. मात्र उपांत्य फेरीत पोचल्यामुळे लक्ष्य सेन ला पॅरीस मध्ये होणाऱ्या ऑलिंम्पिकसाठी महत्त्वाचे गुण मिळणार आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

इग्लंड विरूद्ध सुरू असलेल्या क्रिकेट कसोटी मालिकेतली पाचवी कसोटी भारतानं एक डाव आणि 64 धावांनी जिंकली आहे. पाच सामन्यांची ही मालिका भारतानं 4-1 अशी जिंकली आहे. पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या डावात इंग्लंडचे आघाडीचे फलंदाज चमक दाखवू शकले नाहीत. भारताकडून आर अश्विन नं पाच गडी बाद केले तर जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव यांनी तिसऱ्या दिवसाच्या दुसऱ्या सत्रात प्रत्येकी दोन बळी घेतले.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.